ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख १५ ऑक्टोबर, १९५८ अंक ४१

## विविध माहिती

**वृत्तपत्रांवर राग**—युरोपच्या दौऱ्यावरून परत आल्यावर अहमदाबाद येथें बोलतांना, सर्वोदयी पुढारी श्री. जयप्रकाश नारायण म्हणाले कीं, जगांतील अर्ध्याअधिक दुःखाचें कारण वृत्तपत्रें आहेत. त्यांच्याएवजीं सर्व जगाला सत्य घटनांची माहिती देणारी वृत्तसंस्था शांतताप्रिय लोकांनीं चालविली, तर चांगले होईल.

**जपानी नागरिक हिंदी शिकणार**—कलकत्ता शहरांतील व त्याच्या परिसरांतील जपानी नागरिकांना हिंदी व बंगाली भाषा शिकविण्यासाठी वर्ग काढण्यांत येणार असल्याचें कलकत्त्या-मधील जपानी कॉन्सलनें जाहीर केलें आहे. बंगाली लोक व त्यांच्या सांस्कृतिक परंपरा अधिक चांगल्या रीतीनें जाणतां याव्यात, म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**प्राचीन शहराचें उत्खनन**—गुजरातमधील लोथल ह्या गांवाजवळ हराप्पा संस्कृतीमधील एका शहराचे अवशेष सांपडले होते. तेथील उत्खनन आतां पुन्हा चालू करण्यांत आलें आहे. ह्या संस्कृतीचे पूर्वी सांपडलेले अवशेष आतां पाकिस्तानमध्यें गेले आहेत. ख्रिस्तपूर्व ४,००० वर्षांपूर्वीची ही संस्कृति बऱ्याच दूरवर पसरलेली असावी, असा अंदाज आहे लोथल येथें २ लाख रुपये खर्चून एक वस्तुसंग्रहालय बांधण्यांत येणार आहे.

**रुरकेला कारखान्यासाठीं एंजिनें**—रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्याला लागणारा कच्चा माल वाहून नेण्या-साठी व पक्का माल नेण्यासाठी दक्षिण–पूर्व रेल्वेवर २० डिझेल इलेक्ट्रिक एंजिनें वापरण्यांत येणार आहेत. हीं सर्व एंजिनें अमेरिकेंत तयार झालेलीं आहेत. रेल्वेनें आणखी ६० एंजिनांची मागणी नोंदविलेली आहे.

**हातमागाच्या कापडाची विक्री**—भारत सरकारनें हात-मागाच्या कापडाच्या विक्रीवरील खास सूट पुन्हां चालू करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येकी रुपयामागें ६ नये पैसे सूट खरेदी करणाराला देण्यांत येईल. ही सवलत १ ऑक्टोबरपासून १५ नोव्हेंबरपर्यंत चालू राहील रुपयांत ६ नये पैसे सूट मिळण्याची नेहमींची पद्धत चालू आहेच.

**ओरिसा राज्यांतील खनिजें**—ओरिसा राज्य सरकारच्या खाणीखात्यानें असें जाहीर केलें आहे कीं, राज्याच्या कोरापूट व कालाहंडी ह्या भागांत चुनखडी, मँगेनीझ व अभ्रक ह्या खनिजांच्या विस्तृत खाणी सांपडल्या आहेत. चुनखडीच्या खाणी तर १० चौरस मैल क्षेत्रफळावर पसरलेल्या आहेत.

**आंध्रांत उसाचा नमुनेदार मळा**—आंध्र सरकारनें हिंदुपूर ह्या ठिकाणीं उसाची नमुनेदार शेती करणारा मळा लावण्याचें ठरविलें आहे. मळयासाठी येणाऱ्या खर्चापैकी एकतृतियांश खर्च इंडिअन सेंट्रल शुगरकेन कमिटी देणार आहे. राज्य सरकारनें मळयाच्या प्राथमिक खर्चासाठी २८,००० रुपये मंजूर केले आहेत.

**कुटुंबनियोजन बोर्ड**—मध्यप्रदेश सरकारनें राज्यांत कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्यासाठी ९ जणांचें एक बोर्ड नेमलें आहे. बोर्डांत सात बिन–सरकारी व दोन सरकारी सभासद आहेत. कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमासाठी राज्यसरकारनें ५·५८ लाख रुपयांच्या रकमेची तरतूद केली आहे.

**गिरणीकामगारांना बोनस**—अहमदाबादमधील १० लाख कामगारांना १९५७ सालांतील बोनस म्हणून १॥ कोटी रुपये लवकरच मिळणार आहेत. कामगार व गिरणी मालक ह्यांच्यांत झालेल्या पांच वर्षांच्या कराराप्रमाणें हा बोनस देण्यांत येत आहे. २३ गिरण्या १५ दिवसांचा पगार व ११ गिरण्या तीन महिन्यांचा पगार बोनस म्हणून देणार आहेत.

**'लायका' कुत्रीवरील परिणाम**—दुसऱ्या रशिअन उप-ग्रहांतून अंतराळांत पाठविण्यांत आलेल्या 'लायका' कुत्रीवरील वैद्यकीय परिणामाविषयीं दोघां रशिअन डॉक्टरांनीं माहिती प्रसिद्ध केली आहे. रॉकेटचें उड्डाण झाल्याबरोबर तिच्या हृदयाच्या स्पंदनांत एकदम तिप्पट वाढ झाली पण नंतर मात्र रॉकेटची गति वाढत असतांनाहि स्पंदन नेहमींप्रमाणें झालें.

**अमेरिकेंतील निग्रो वंश**—अमेरिकेंतील निग्रो वंश व गौर-वर्णीय वंश ह्यांच्यांतील वर्णसंकर गेलीं तीन शतकें चालू आहे. हा वर्णसंकर असाच चालू राहून आणखी पांचशें वर्षांच्या कालांत निग्रो वंश गौरवंशीयांत पूर्णपणें मिसळून जाईल, असा अंदाज एका अमेरिकन वंशशास्त्रज्ञानें केला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**मनमाड शहराचा पाणीपुरवठा—** मनमाड शहराला उन्हाळ्यांत पाण्याचा तुटवडा फार जाणवतो. म्युनिसिपालिटीनें रेल्वेबोर्डाच्या सहकार्यानें पाणीपुरवठा करण्याची एक योजना तयार केली असून बोर्ड सध्यां तिचा विचार करीत आहे. योजना अमलांत आल्यास एंजिनांनाहि पाणी पुरवण्यांत येईल व त्याबद्दल रेल्वेला ५ लाख रुपये द्यावे लागतील. मनमाडमधील लोकसंख्येंत एकतृतियांश भाग रेल्वेनोकरांचा आहे.

**सहकारी संस्थेला कर्ज—** नागपूर येथील कुटुंबहित सहकारी संस्थेल मध्यवर्ती सरकारनें २०,००० रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ही संस्था शिक्षणासाठी लागणारीं खेळणीं व इतर उपकरणी तयार करणार आहे. कर्जाशिवाय संस्थेला ४३,००० रुपयांची देणगी देण्यांत आली आहे. कर्जाची रक्कम यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठी खर्च करण्यांत येईल.

**इराक-युगोस्लाव्हिआ करार** इराक व युगोस्लाव्हिआ ह्या देशांच्या दरम्यान एका व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या. इराक युगोस्लाव्हिआकडून यंत्रसामुग्री विकत घेणार आहे. त्याशिवाय आर्थिक, शास्त्रीय व तांत्रिक बाबतींत उभयता देश सहकार्य करणार आहेत. इराकमध्यें क्रांति झाल्यावर एका कम्युनिस्ट सरकारकडून करण्यांत आलेला हा पहिलाच करार आहे.

**जपान-भारत व्यापार—** भारत व जपान ह्यांच्यामधील व्यापारांत भारताला प्रतिकूल तफावतीला तोंड द्यावें लागत आहे. ह्या परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठी जपाननें भारताकडून अधिक माल विकत घ्यावा अशी सूचना मध्यवर्ती सरकारचे व्यापारमंत्री श्री. नित्यानंद कानुगो ह्यांनीं केली आहे. जपान भारताकडून लोखंडाची माती घेण्यास तयार आहे.

**पाकिस्तानांत युरेनिअमचा आढळ—** पाकिस्तानमधील चित्रळच्या आसपास युरेनिअम-मिश्रित खनिज सांपडल्याची बातमी आहे. पाकिस्तानच्या भूगर्भशास्त्रज्ञांनीं संशोधनासाठी एका अमेरिकन तज्ज्ञाचें साह्य घेतलें होतें. चित्रळच्या भागांत लोखंड, तांबें, शिसें, इत्यादि खनिजेंहि सांपडतात. युरेनिअमचा सांठा किती आहे, तें समजलेलें नाहीं.

**रेडिओ ऐकणारांच्या संवयी—** म्हैसूर येथील महाराजा कॉलेजच्या एम्. एस्सी. च्या विद्यार्थ्यांनीं शहरांतील रेडिओ ऐकणारांच्या संवयींचा अभ्यास करण्यासाठी आंकडेशास्त्रीय तपासणी करण्याचें ठरविलें आहे. १० दिवसपर्यंत ते म्हैसूर शहरांत हिंडून रेडिओवाल्यांच्या पसंती-नापसंतीबद्दल माहिती गोळा करतील.

**रेल्वेच्या साहित्याची मागणी** रेल्वेच्या वाघिणी तयार करण्यासाठी लागणाऱ्या कांहीं साहित्यांच्या मागणीची नोंद एका जर्मन कारखान्याकडे करण्यांत आली आहे. ह्या साहित्याची किंमत सुमारें ३० लाख रुपये होईल. सामुग्रीचा उपयोग करून प्रत्यक्ष वाघिणी तयार करण्याचें काम मात्र भारतामधील कारखान्यांना देण्यांत येणार आहे.

**ऑस्ट्रेलिआकडून गव्हाची मदत—** कोलंबो मदत योजनेप्रमाणें ऑस्ट्रेलिआ भारताला ९,००० टन गव्हाचा पुरवठा करणार आहे. गव्हाची किंमत सुमारें ३० लाख रुपये होईल. गहूं भारतांत विकून जो पैसा उभा राहील, त्याचा उपयोग भारतामधील कांहीं विकासयोजनांवरील खर्चासाठी केला जाणार आहे.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | : | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १५ ऑक्टोबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पंचवार्षिक कार्यक्रमांत समतोलपणाचा अभाव

हिंदुस्थानची फाळणी होण्यापूर्वीच्या मध्यवर्ती सरकारचे अर्थखात्याचे फडणीस सर जेरेमी रैसमन ह्यांनीं भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या गुणावगुणाविषयीं आपले विचार व्यक्त केले आहेत. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधि ह्यांच्या दिल्ली येथें भरलेल्या वार्षिक बैठकीसाठी बँकेनें त्यांना खास आमंत्रण दिलेलें होतें. स्वातंत्र्यपूर्व काळांत भारतीय सरकारशीं त्यांचा तीस वर्षेंपर्यंत संबंध आलेला आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या खास मुलाखतींत ते म्हणाले कीं, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या भारी उद्योगधंद्याच्या विभागांत आणि शेती व रोज खपाच्या वस्तू उत्पन्न करणाऱ्या उद्योगधंद्यांत समतोलपणा नाहीं. भारी उद्योगधंद्याचें फार मोठें ओझें उभारण्यांत यावयाचें आहे. पण तें पेलण्यासाठी शेतीचा पाया जितका असावयास पाहिजे तितका तो नाहीं. भारतांत खाजगी मालकीचा विभाग व सार्वजनिक मालकीचा विभाग ह्यांनीं सुखासमाधानानें नांदावे म्हणून वास्तववादी आर्थिक धोरण स्वीकारण्यांत येत आहे, तोंपर्यंत दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला व नंतरच्या कार्यक्रमांनाहि ब्रिटिश सरकारकडून व खाजगी भांडवलदारांकडून मदत मिळत राहील. भारताचें औद्योगीकरण द्रुतगतीनें होण्याचे मार्गांत दोन प्रमुख अडथळे आहेत. कामगारवर्गाला भरमसाठ सवलती देण्यांत आल्या तर त्यामुळें उत्पादनावर दुष्परिणाम होतो, हा एक अडथळा. दुसरा म्हणजे, लोकसंख्येची अनिर्बंध वाढ. कम्युनिस्ट चीनशीं तुलना करतां भारताची आर्थिक परिस्थिति अधिक चांगली असावयास पाहिजे हें खरें. पण कम्युनिस्ट देशांत मानवी स्वातंत्र्यावर घालण्यांत येणारीं अन्याय्य बंधनें येथेंहि घालून आर्थिक प्रगति साधावी असा त्याचा अर्थ नाहीं.

प्रधानत्वें शेतीवर अवलंबून असणाऱ्या भारतासारख्या देशानें अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण नसणें, ही गोष्ट स्पृहणीय नाहीं. अन्न व उद्योगधंद्यांसाठी लागणारा कच्चा माल ह्यांना सारखेंच महत्त्व देण्यांत आलें पाहिजे. ब्रिटनमध्यें तें तसें देण्यांत आलें आहे. भारतामधील राहणीचें मान अतिशयच खालच्या पातळीचें आहे. म्हणून हें धोरण कटाक्षानें पाळण्यांत येणें अधिकच महत्त्वाचें आहे. भारतांत भारी उद्योगधंद्याची वाढ होऊं नये अशी ब्रिटनची इच्छा आहे, अशा प्रकारची समजूत कांहीं ठिकाणीं आढळून येते. पण ती समजूत खरी नाहीं. ह्या बाबतींत मदत करण्यास ब्रिटन मागेंपुढें पहात नाहीं. तरी सुद्धां पैशाच्या उपलब्धतेच्या कांहीं मर्यादा पडतातच. भारत हा एक लोकशाही देश आहे. तेव्हां खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध असलेल्या मार्गाचा अवलंब करावयास लावणें युक्त होणार नाहीं. परदेशांतील भांडवलवाल्या वर्गाला भांडवल गुंतविण्यास योग्य असें वातावरण येथें आहे असें वाटलें पाहिजे आणि तें तसेंच टिकेल अशीहि त्याची खात्री झाली पाहिजे. भारतानें लोकशाहीच्या मार्गानें समाजवादी ढंगाची समाजरचना उभारण्याचें ध्येय ठरविलें आहे ह्या गोष्टीची जाणीव ब्रिटनमध्यें आहे, तरीपण दीर्घ कालावधीच्या दृष्टीनें ह्या बाबतींत चिंताहि वाटत आहे. केरळ, पश्चिम बंगाल आणि आंध्र ह्या राज्यांतून अलीकडे ज्या राजकीय प्रवृत्ति दिसून आल्या त्यांच्यामुळें ह्या चिंतेला उतार पडलेला नाहीं. भारतांत खाजगी उद्योगधंद्यांना जगूं दिलें जातें, प्रोत्साहन दिलें जात नाहीं, असा भास कधींकधीं होतो. ब्रिटनमध्यें अशी स्थिति नाहीं. ब्रिटनमध्यें खाजगी कारखानदार आणि सार्वजनिक मालकीच्या विभागांतील त्याच्या तोलाचा अधिकारी ह्यांना सरकार व लोक सारखाच मान देतात. ह्या बाबतींत कांहीं अढी असल्यास ती जितक्या लवकर नाहींशी होईल तितकें बरें.

---

## दिल्ली येथील राष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन

भारतानें स्वातंत्र्यानंतरच्या काळांत केलेल्या औद्योगिक प्रगतीची कल्पना देणारें राष्ट्रीय प्रदर्शन दिल्ली येथें भरविण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनाचा एक विशेष असा आहे कीं, प्रदर्शनांत भाग घेणाऱ्या उद्योगधंद्यांच्या मंडपाचे वेगवेगळे गट करण्यांत आले आहेत. त्यामुळें त्या त्या उद्योगधंद्यानें केलेल्या प्रगतीची पूर्ण कल्पना येऊं शकेल. भारी उद्योगधंदे, एंजिनिअरिंग, कापड–कारखाने, पोलाद, अशासारखे १२ गट करण्यांत आलेले आहेत. हिंदुस्थान स्टील कंपनीनें आपल्या जागेंत धुराड्यांच्या तीन प्रतिकृति ठेवल्या आहेत. भारतांत स्थापन करण्यांत येत असलेल्या रुरकेला, दुर्गापूर आणि भिलाई ह्या पोलादाच्या कारखान्यांचीं तीं प्रतिकें म्हणतां येतील. खाजगी मालकीच्या विभागांतील उद्योगधंदे व सार्वजनिक मालकीच्या विभागांतील उद्योगधंदे असा फरक ठेवण्यांत आलेला नाहीं. दोन्ही भागांतील उद्योगधंद्यांना आपआपला माल मांडण्याची संधि देण्यांत आलेली आहे. प्रदर्शनाच्या आवारांत जाण्यासाठी चार प्रवेशद्वारें ठेवण्यांत आलीं असून त्यांचीं नांवें 'व्यापारद्वार', 'प्रगतिद्वार', 'शास्त्रद्वार' व 'उद्योगद्वार' अशीं ठेवण्यांत आलीं आहेत. भारत सरकारच्या खाणी व जळणखात्यानें तेलाच्या विहिरी खोदण्याचीं साधनें मांडलीं आहेत. विजेच्या उपकरणांच्या उद्योगधंद्यांनींहि आपला माल प्रदर्शित केला आहे. दामोदर खोरें–योजनेची एक प्रतिकृति मांडण्यांत आली आहे. तीवरून विविध उपयोगाच्या नदीखोरें योजनांच्या व्यापाची चांगली कल्पना येते. प्रदर्शनाचें आवार १२३ एकर जमिनीवर पसरलेलें आहे. त्यांतील ४६ एकर जमीन पूर्वी निरुपयोगी होती. प्रदर्शन बहुधा दोन महिने खुलें राहील

---


### "अर्थ" दिवाळी अंक

प्रतिवर्षीप्रमाणें, "अर्था"चा मोठा दिवाळी अंक दि. ११ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

## पूर्वखानदेश सें. को. बँक लि.

( १ ) बँकेच्या एकूण ३७ शाखा आहेत. अहवालाचे सालीं हातेड ( ता. चोपडा ) व बहादरपूर ( ता. पारोळा ) येथें दोन नवीन शाखा उघडल्या.

( २ ) भाग भांडवल ६,२८,५०० रु. नीं वाढून तें ३६,४५,६०० रु. झालें.

( ३ ) ठेवींत एकूण ३५ लक्ष रुपयांनीं वाढ होऊन त्या ३,३८,२५,७१८ रु. च्या झाल्या. ठेवींपैकी निम्म्याहून ज्यास्त ठेवी जिल्ह्यांतील खेड्यांतील जनतेच्या आहेत.

( ४ ) पायलट योजनेची प्रगति होत आहे. कर्जाचा एकरीं सरकारी दर वाढविण्यांत आला आहे. लहान आकाराच्या सोसायट्यांचें मोठ्या आकाराच्या सोसायट्यांत रूपांतर चालूं आहे.

( ५ ) जिल्ह्यांत वस्तीचीं गांवें १४२४ आहेत. १४१० गांवें सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रांत समाविष्ट आहेत. म्हणजे ९९% खेडीं सहकारी कार्यक्षेत्रांत आलीं आहेत. शेतकऱ्यांचे बाबतींत हें प्रमाण ६३·५% आहे.

( ६ ) अहवालाचे वर्षअखेर येणें कर्ज १५८ लक्ष रु. आहे; म्हणजे तें गेल्या वर्षीपेक्षा १२ लक्ष रु. नीं ज्यास्त आहे. पायलट योजनेखालीं ज्यास्त कर्ज देण्याबाबत जो एक कस (कर्ज घेणाऱ्या सभासदानें आपला शेतीचा माल सहकारी संस्थेमार्फत विकला पाहिजे ) लावला आहे, त्या कसास उतरणाऱ्या सभासदांची संख्या अपेक्षेप्रमाणें वाढत नाहीं; बँकेची अट पुरी करून तिचा फायदा घेण्यास पुरेसे सभासद शेतकरी बांधव पुढें येत नाहींत.

(बँकेच्या तीन शाखांखेरीज सर्व शाखा नफ्यांत आहेत. एकूण नफा ५,५४,३४७ रु. झाला. ५% डिव्हिडंडला १,९०,८१८ रु. लागतील.

## शेड्यूल्ड बँकांचीं उद्देशानुसार कर्जें

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | ऑक्टोबर १९५७ | | एप्रिल १९५८ | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम | % | रक्कम | % |
| कारखानदारी | ३८३·७ | ४३·६ | ४४१·९ | ४५·३ |
| कपास- कापड | १११·२ | १२·६ | १३२·४ | १३·६ |
| तागी कापड | २८·२ | ३·२ | १८·७ | १·९ |
| लोखंड, पोलाद, इंजिनिअरिंग | ८४·८ | ९·६ | ८६·६ | ८·९ |
| कोळसा, खाणी | ९·२ | १·० | ८·५ | ०·९ |
| रसायनें, रंग | १४·९ | १·७ | १७·६ | १·८ |
| साखर | २७·८ | ३·२ | ६१·२ | ६·३ |
| व्यापार | ३७५·९ | ४२·७ | ४१२·९ | ४२·४ |
| शेतमालाचे घाऊक व्यापारी | ८०·० | ९·१ | १३१·९ | १३·५ |
| बिगर-शेतमालाचे घाऊक व्यापारी | १७४·१ | १९·८ | १६१·४ | १६·६ |
| किरकोळ व्यापारी | १४·७ | १·७ | १३·१ | १·३ |
| शेती | २४·२ | २ ७ | १८·५ | १·९ |
| वैयक्तिक व व्यावसायिक | ६१·४ | ७·० | ६४·० | ६·६ |
| इतर | ३५·५ | ४·० | ३७·३ | ३·८ |
| एकूण | ८८०·६ | १००·० | ९७४·६ | १००·० |

## शेड्यूल्ड बँकांचीं तारणावरील कर्जें

( आकडे लक्ष रुपयांचे )

| तारणाचें स्वरूप | २५ ऑक्टो. १९५७ | २५ एप्रिल १९५८ | फरक |
|---|---|---|---|
| तारणावरील एकूण कर्जें | ७०४,९९ | ७९२,९१ | + ८७,९२ |
| १ अन्नधान्यें | १४,०१ | २३,१६ | + ९,१५ |
| भात, तांदूळ | ४,२१ | १३,९६ | + ९,७५ |
| गहूं व इतर धान्यें | ९,८० | ९,२० | − ६० |
| २ औद्योगिक कच्चा माल | ७७,९३ | १३०,३७ | + ५२,४४ |
| भुइमूग | १,९७ | ११,६४ | + ९,६७ |
| इतर तेल-बिया | १०,७८ | १७,६७ | + ६,८९ |
| कपास | ४४,२४ | ७९,२६ | + ३५,०२ |
| कच्चा ताग | १५,३३ | १६,२७ | + ९४ |
| कातडी | ५,६१ | ५,५३ | − ८ |
| ३ मळ्यांतील पिकें | ३५,०३ | ३८,९७ | + ३,९४ |
| ४ तयार माल, खानिजें | ३०४,१९ | ३१८,९७ | + १४,७८ |
| साखर, गूळ | २८,१४ | ६३,४३ | + ३५,२९ |
| कपास कापड | १००,५० | १००,२८ | − २२ |
| तागी कापड | १९,२६ | १५,१७ | − ४,०९ |
| इतर कापड | १५,७१ | १४,३७ | − १,३५ |
| लोखंड-पोलाद् | १००,६७ | ८८,१० | − १२,५७ |
| धातू | १३,५३ | १०,३९ | − ३,१४ |
| कोळसा, मँगेनीज्, इ. | १०,१६ | १०,८५ | + ६९ |
| रसायनें, रंग, इ. | १६,२२ | १६,३८ | + १६ |
| ५ इतर तारण | २७३,८३ | २८१,४५ | + ७,६२ |
| सोनें-चांदी | २,९० | १,१८ | − १,७२ |
| सरकारी, इतर रोखे | ४२,५० | ३९,८० | − २,७० |
| शेअर्स | ७४,५२ | ७५,०१ | + ४९ |
| औद्योगिक कंपन्यांची मालमत्ता | ३२,०२ | ३३,१६ | + १,१४ |
| इतर | १०१,५७ | १११,३७ | + ९,८० |

**भूतानला जाण्यासाठीं रस्ते**— भूतानला जाण्यासाठीं सध्यां तिबेटच्या प्रदेशांतून जावे लागते आणि शिवाय हा रस्ता लांबचा व अडचणींचा असल्यानें घोड्यावरून व याकवरून प्रवास करावा लागतो. भूतानला जाण्यासाठीं दोन रस्ते बांधण्याची प्राथमिक तयारी करण्यांत येत आहे. एक रस्ता पश्चिम बंगालमधून व दुसरा आसाममधून भूतानच्या सरहद्दीपर्यंत काढला जाईल.

**ओरिएंटल गॅस कंपनी**—बंगाल सरकारनें कलकत्त्याची ओरिएंटल गॅस कंपनी दोन वर्षें मुदतीकरता आपल्या ताब्यांत घेतली आहे. कंपनीच्या यंत्रसामुग्रीच्या दुरुस्तीसाठी सरकारला २५ लाख रुपये तावडतोब खर्च करावे लागणार आहेत. दुर्गापूर येथील गॅस कंपनीस मिळूं लागल्यावर कंपनी परत मालकांना मिळण्याचा संभव आहे.

**भंडारदरा येथें विश्रांतिस्थान**—अहमदनगर जिल्ह्यांतील भंडारदरा ह्या ठिकाणचे मध्यमवर्गीयांसाठी विश्रांतिस्थानांत रूपांतर करण्यांत येत आहे. हवा खाण्याचें हें ठिकाण मुंबईपासून ११० मैलावर व नाशिकपासून ४० मलांवर आहे. ह्या ठिकाणीं घरें बांधण्यासाठीं १०८ प्लॉटस तयार करण्यांत आले असून ते विक्रीला काढण्यांत आले आहेत. १॥ लाख रुपये खर्चून सरकार एक अतितीगृह बांधणार आहे.

## शिवण्याच्या यंत्रांची वाढती निर्यात

### आयात करणारांत इंग्लंड अग्रेसर

भारतीय बनावटीच्या शिवण्याच्या यंत्रांच्या निर्यातींतून या वर्षाच्या पूर्वार्धांत ३·७८ लाख रुपयांची परकीय हुंडणावळ मिळाली. १९५७ च्या एकूण वर्षाचा हा आंकडा ५·५१ लाख रुपये होता. या वर्षाच्या पूर्वार्धांत अशा ३४५६ यंत्रांची निर्यात झाली. गेल्या वर्षी एकूण ४४६५ यंत्रांची निर्यात झाली होती. १९५६ मध्यें ४·६६ लाख रुपये किंमतीच्या यंत्रांची निर्यात झाली होती.

या यंत्रांची निर्यात झालेल्या २३ देशांत सर्वांत जास्त यंत्रें (१००० ) इंग्लंडनें मागविलीं. त्यानंतर अफगाणिस्तान (६८२) थायलंड (५४०), सीलोन (३२९), मलाया (२००) व सिंगापूर (१७०), अमेरिका व ब्रिटिश गिआना (प्रत्येकी १००) यांचा क्रम लागतो. तसेंच केनिया, जॉर्डन, मादागास्कर, टांगानिका, सुदान, पाकिस्तान, युगांडा, इराक, ऱ्होडेशिया, सौदी अरबस्तान, झांझिबार, मॉरिशस, ब्रह्मदेश, नेपाळ व व्हिएटनाम इत्यादि देशांकडेहि या यंत्रांची निर्यात झाली.

या यंत्रांच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी इंजिनिअरिंग निर्यात वाढ मंडळानें अनेक उपाय योजले. सदर मंडळानें या वर्षाच्या ऑगस्ट अखेरीस शिवण्याच्या यंत्रासुद्धां निरनिराळ्या प्रकारच्या इंजिनिअरिंग मालासाठी बाजारपेठा मिळविण्यासाठी प. आफ्रिका व बेल्जियम कांगो येथें एक शिष्टमंडळ पाठविलें. त्याचप्रमाणें युरोपमध्येंहि यासाठी लवकरच एक पाहणी तुकडी जाण्याची अपेक्षा आहे. या बाजारपेठ पाहणीचे अहवाल निर्यातदारांकडे पाठविण्यांत येतात.

आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत तसेंच सीलोन, इंडोनेशिया, पाकिस्तान व इजिप्त यांसारख्या देशांतील भारतीय मंडळाच्या प्रदर्शनांत शिवण्याचीं यंत्रें मांडण्यांत येतात.

या यंत्रांच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी निर्यातदारांस खास सवलती देण्यांत येतात. या देशांत हीं यंत्रें तयार करणारे ७ मोठे कारखाने व छोट्या उद्योगधंद्यांवरील विकास कमिशनरांनीं मान्यता दिलेले ३६ छोटे कारखाने आहेत.

---

### तुमचें स्थान कोणतें ?

[ लेखक : श्रीयुत श्री. वा. काळे, पृष्ठ सं. १२० किंमत दोन रुपये ]

" ' कण व क्षण, ' ' पुढें पाऊल ' या लेखकाच्या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणें या पुस्तकाची रचना आहे. यांत एकंदर १९ लेख आहेत व ते लघुनिबंधाच्या धर्तीवर लिहिलेले आहेत. श्री. काळे यांच्या तीनहि पुस्तकांतून त्यांच्या लेखनाचें मुख्य सूत्र एकच आहे, तें म्हणजे ' प्रत्येक बाबतींत थोडा पूर्वविचार केला तर त्यामुळें आपलें व समाजांतील इतर व्यक्तींचें जीवन जास्त सुखकर करतां येईल. ' पुस्तकाची भाषा प्रौढ असून सुबोध आहे व घरगुती उदाहरणें घेऊन पुस्तक मनोरंजक केलें आहे. भोंवतालीं वावरणाऱ्या माणसांच्या काय चुका होतात व त्या कशा टाळतां येतील हें सहानुभूतीनें सूचित करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केलेला आहे." महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेनें पुरस्कार करतेवेळीं व्यक्त केलेला अभिप्राय.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९१८] सारस्वत बँक गृह, मुंबई ४ [ टेलिफोन २७०९४

३, ५ व १० वर्षें मुदतीचीं
सिल्व्हर ज्युबिली सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें } व्याज ३॥ ते ४॥ टक्के

: बँकेच्या शाखा :
फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव ★ महिला शाखा : सारस्वत बँक गृह, मुंबई ४.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

आगामी प्रकाशन

મધુમાલતીનું સૌંદર્ય

मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
गुजराती अनुवादक:
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

## ब्रिटिश सौंदर्य-प्रसाधनांचा धंदा

सौंदर्य-प्रसाधनांचा धंदा वाढत आहे. गेल्या वर्षी ब्रिटिश कारखानदारांनीं ३४० पौंड किंमतीचीं सौंदर्य-प्रसाधनें विकलीं; त्यांपैकी ८१ लक्ष पौंडांचीं प्रसाधनें निर्गत झालीं. कारखानदारांच्या विक्रीच्या किंमतीवर किरकोळ दुकानदारांचे ५०% कमिशन असतें; खरेदीचा कर ९०% घेतो. म्हणजे गिऱ्हाइकांनीं गेल्या वर्षी सौंदर्य-प्रसाधनांसाठी ६१८ लक्ष पौंड दिले. ह्याचा अर्थ, १४ वर्षांवरील प्रत्येक स्त्रीनें ३ पौंड सौंदर्य-प्रसाधनांवर खर्च केले. १६ ते ६४ वयाच्या प्रत्येक चार स्त्रियांपैकी तीन स्त्रिया सोप पावडर आणि लिपस्टिक वापरतात; इतर सौंदर्य प्रसाधनें वापरणाऱ्याहि दुसऱ्या आहेत. हें प्रमाण वाढत जात आहे. कारण, कित्येक वयस्कर स्त्रियांनीं त्यांचा कधींच उपयोग केलेला नसणार; तरुणींच्यामध्यें त्यांचा वापर प्रसार पावत आहे आणि त्या म्हाताऱ्या झाल्या तरी तो वापर थांबविण्याचा संभव नाहीं !

सौंदर्य-प्रसाधनांच्या कच्च्या मालापेक्षा त्यांच्या बाटल्यांना व डब्यांना जास्त खर्च पडलेला असतो. १९५४ मध्यें कच्चा माल व सर्पण ह्याप्रीत्यर्थ कारखानदारांनीं ६३ लक्ष पौंड खर्च केला; बाटल्या, डब्या व इतर वेष्टनें ह्यांस ८२ लक्ष पौंड लागले.

सौंदर्य-प्रसाधनाच्या कारखानदारांची संख्या १९४८ मध्यें १,१०० होती ती आतां २४० आहे; लहान कारखाने बंद पडून मोठे कारखाने त्यांची जागा घेत आहेत. सौंदर्य-प्रसाधनांच्या बाबतींत अमेरिकेचें नेतृत्व निर्विवाद आहे; एलिझाबेथ आर्डेन, मॅक्स फॅक्टर, पॉंड्स, क्युटेक्स, टोनी, व्हॅसेलिन, हीं नांवें हीच गोष्ट स्पष्ट करतात. जाहिरात आणि प्रचार ह्यावरील खर्च लहान कारखानदारांना परवडत नसल्यामुळें, लहानांची संख्या कमी होणें अपरिहार्य आहे.

६०% परचेस टॅक्स विचारांत घेतला, तर गिऱ्हाइकानें दिलेल्या किंमतीच्या निम्मी रक्कम प्रत्यक्ष कारखानदाराला मिळते; एक चतुर्थांश रक्कम किरकोळ दुकानदाराजवळ रहाते व २९% परचेस टॅक्सच्याद्वारां सरकारकडे जाते. कारखानदाराच्या किंमतींत २२% वेष्टनांवरील खर्च, १२% मजुरी, १७% कच्चा माल, अशी वांटणी होते. उरलेल्यांतून कर, भाडें, जाहिरात, विक्रीखर्च, घसारा, नफा, ह्यांस वाव रहातो.

---

### रत्नागिरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, रत्नागिरी

सालअखेर २५१२ सभासद होते. त्यांपैकी १०७ सहकारी मंडळ्या व ३११ नाममात्र सभासद होते. सालअखेर येणें कर्ज रु. १६,४७,६४५ असून त्याचें खेळतें भांडवलाशीं प्रमाण शें. ५५.२ पडतें. वाढते महागाईमुळें कर्जवसुलीवर अनिष्ट परिणाम होत असून त्यामुळें थकबाकींत थोडी वाढ झालेली आहे. थकबाकी कमी करण्याचे प्रयत्न शक्य ते सुरू आहेत. सभासद सहकारी मंडळ्यांकडून येणें कर्ज रु. ९८९५.०७ आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचें काम लवकरच सुरू होईल. तें झाल्यावर सदर कर्जें त्या बँकेकडे वर्ग होतील. अहवालाचे सालांतील वैशिष्ट्यें म्हणजे, व्यापारी बँकांनीं ठेवींवरील व्याजाचे दरांत केलेली स्पर्धा, व कर्जावरील वाढविलेले व्याजाचे दर, हीं होत. या स्पर्धेबरोबर बँकेनें टिकाव धरला आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. भागदारांना ६½% डिव्हिडंड मिळणार आहे.

---


सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

# दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

**मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २५ शाखा**

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |
| ★ सेव्हिंग्ज खातें | द. द. शें. | २ | टक्के |
| होम सेव्हिंग्ज खातें | ,, | २॥ | ,, |

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, | सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, | एक कोटी, सदतीस लाख |

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.



स्थापना सन १९३५ टे. नं. ६६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

(१९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली)

| | | |
|---|---|---|
| संकलित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गे. गो. ढोले, (उपाध्यक्ष)
श्री. उ. भा. तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. म. बा. बेंडे, (ऑ. खजिनदार)
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ह्मा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

## श्रीबलभीम को. बँक लि., कोल्हापूर

गुदस्ता सालअखेर शेअरभांडवल १,०१,६७० रु. चें होतें, तें आतां १,०३,४५० रु. झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंड, १,१७,८७६ रु. चें १,२५,७३३ रु. वर गेलें आहेत. ठेवीची रक्कम ४,३३,८६० रु. होती, ती ४,६०,०६६ रु झाली आहे

"सभासदांच्या आर्थिक उन्नतीबरोबरच त्यांची सामाजिक उन्नति करण्याकडे. शैक्षणिक प्रगति करण्याकडे, त्यांचें आरोग्य सुधारण्याकडे, त्यांच्यांत व त्यांच्या मुलाबाळांत वाचनाची आवड वाढविण्याकडे, त्यांच्या अल्पस्वल्प गरजा भागविण्याकडेहि बँकेनें प्रथमपासूनच कशी ध्येयदृष्टि ठेवली होती हें खालील गोष्टींवरून कळून येईल. : —

(१) सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक सार्वजनिक संस्थांना बँकेनें आतांपर्यंत आपल्या धर्मादाय फंडांतून सढळ हातानें हजारों रुपयांची मदत केली आहे (२) शैक्षणिक :— शिक्षणफंडांतून १ टका मामुली व्याजानें आपल्या सभासदांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शेंकडों रुपयांची मदत बँक दरवर्षी करीत असते. या फंडांतून रकमा घेऊन अनेक होतकरू विद्यार्थी पुढें आले आहेत व अनेक गरीब विद्यार्थ्यांना आपला पुढील शिक्षणक्रम पूर्ण करतां आला आहे. (३) कै. श्रीपतराव शिंदे वाचनालय :— बँकेचे संस्थापक कै. गुरुवर्य श्रीपतराव शिंदे, संपादक "विजय मराठा" यांचे पुण्यस्मरणार्थ बँकेच्या वाचनालयास त्यांचें नांव १० वर्षांपूर्वी देण्यांत आलें आहे. या वाचनालयासाठी बँक दरसाल ५०० रु. बजेट मंजूर करीत असून विविध विषयांवरील निवडक उत्तमोत्तम मराठी, इंग्रजी व हिंदी पुस्तकें, तसेंच प्रमुख लोकप्रिय ५ दैनिकें, ८ साप्ताहिकें, १ अर्ध साप्ताहिक व १० मासिकें घेण्यांत येतात तसेंच कोल्हापूर म्युनसिपल बरोकडून वाचनालयासाठी कांहीं मासिकें व वर्तमानपत्रें देणगीरूपानें मिळतात. या वर्षी वाचनालयास ७६ रु. किंमतीचीं पुस्तकें मिळालीं आहेत याबद्दल संस्था देणगीदारांची आभारी आहे. चालू वर्षी कै. शिंदे वाचनालयांत ८१ नवीन पुस्तकें घेतलीं असून सध्यां एकूण १४८३ पुस्तकें आहेत. वाचनालयासाठी स्वतंत्र ग्रंथपालाची नेमणूक करण्यांत आली असून दररोज नियमितपणें पुस्तकें देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. शिवाय वृत्तपत्रें व मासिकें विभाग शक्यतों सर्व दिवसभर तें रात्रौं ९ वाजेपर्यंत सर्वांना मोफत खुला ठेवला आहे. त्यामुळें सवडीप्रमाणें दिवसांतून रात्रौं ९ वाजेपर्यंत केव्हांहि येऊन वाचण्याची सोय झाली आहे. त्याचा फायदा शेंकडों वाचक घेत आहेत. त्याचप्रमाणें वाचनालयाच्या हॉलमध्यें रेडिओ ठेवला आहे. करमणूक व ज्ञानप्रसार या दृष्टीनें या आधुनिक साधनाचा किती उपयोग होतो हें निराळें सांगावयास नकोच. (४) आरोग्य :— बँकेच्या आरोग्य उपसमितीनें थर्मामिटर, आईस बॅग, बेडपॅन, हॉट वॉटर बॅग, वगैरे उपकरणें सभासदांना जरूरीच्या वेळीं घरीं देण्याची व्यवस्था केली आहे. याचें भाडें अगदींच जुजबी ठेवलेलें असतें. त्याचा फायदा १०६ सभासदांनीं चालू वर्षी घेतला असून, त्याचें भाडें रु. ७४–६३ नये पैसे बँकेस मिळाले आहे. याशिवाय घरांतील ढेकूण, डांस, झुरळें, पिसवा, यांचें निर्मूलन करण्याकरितां स्प्रे पंप्स घरीं देण्याची व्यवस्था केली आहे. तसेंच देवी काढण्याचें केंद्रहि बँकेमध्यें ठेवण्यांत आलें आहे. (५) शेतीचीं अवजारें :—कीं ज्या गरीब शेतकरी बंधूंना विकत घेणें मोठ्या खर्चाचें होतें, अशीं सर्व अवजारें बँकेकडून पुरविलीं जातात त्याची झीज म्हणून आकारलेलें अल्प भाडें एकूण रु. ५८–३४ नये पैसे बँकेस मिळाले असून त्याचा फायदा ४३ शेतकरी बंधूंनीं घेतला आहे. लोखंडी नांगर व पिकांवर कीड पडल्यास गॅमेक्झिन पावडर व पंप्स देण्याची व्यवस्था केली आहे. (६) इतर गरजा :—आपल्या सभासदांच्या घरीं लग्नकार्यें, जेवण, धार्मिक व मंगल समारंभ असल्यास लागणारीं लहानमोठीं भांडीं अगदीं अल्प भाड्यानें देण्यांत येतात चालू सालामध्यें असें भाडें रु. ५९७–५२ नये पैसे बँकेस मिळाले असून त्याचा उपयोग २४२ सभासदांनीं घेतला. वरील वस्तूंचा उपयोग आतांपर्यंत ३९१ सभासदांनीं घेतला असून त्यापासून एकूण रु. ७३०–४९ इतकी रक्कम भाडेंरूपानें बँकेस मिळाली आहे.

वरील सारखे प्रसंगोपात लागणारे जिन्नस जरूरीच्या वेळीं उपयोगांत आणण्यासाठी बँकेंत मिळत असल्यामुळें ते विकत घेण्याची सभासदांना आवश्यकता वाटत नाहीं.

त्याचप्रमाणें बँकेनें लोकांच्या सोईसाठी सरकारी स्वस्त धान्याचें दुकान घेऊन लोकांची गैरसोय दूर केली आहे.

अशारीतीनें सभासदांच्या आर्थिक गरजेप्रमाणेंच त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक व इतर जरूरीच्या विविध बाबींकडे लक्ष पुरविणारी ही बँक सर्व मुंबई राज्यांत एवढी एकच असेल असें आम्हीं अभिमानानें म्हणतों."

(वार्षिक अहवालांतील उतारा.)

---

## खाजगी उद्योगधंद्यांच्या स्थानाविषयीं चर्चा

अर्थव्यवस्थेंतील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांविषयीं व त्यांच्या स्थानाविषयीं इंटरनॅशनल फायनॅन्स कॉर्पोरेशनतर्फे एक परिसंवाद दिल्ली येथें झाला. खाजगी उद्योगधंद्यांचा कारभार व त्यांच्या वाढीसाठी जरूर असणारी परिस्थिति यासारख्या मुद्यांवर परिसंवादांत विचार व्यक्त करण्यांत आले. पांच देशांतील उद्योगपतींनीं ह्या कार्यक्रमांत भाग घेतला. सुरुवातीला अमेरिकेंतील कैसर इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनचे अध्यक्ष मि. एडगर कैसर म्हणाले कीं, कोणत्याहि एका आर्थिक पद्धतीची अगर व्यवस्थेची बाजू घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. पण एक गोष्ट मात्र खरी आहे, ती ही कीं उद्योगधंद्यांवर विशिष्ट प्रकारचा साचेबंदपणा लादण्यांत आला तर ते कमकुवत होत जातात. पश्चिम जर्मनींतील एका कारखान्याचे मॅनेजर म्हणाले कीं आर्थिक, द्रव्यविषयक, करविषयक आणि मजूरविषयक सरकारच्या धोरणावर खाजगी उद्योगधंद्यांचें भवितव्य बऱ्याच प्रमाणावर अवलंबून असतें. एखाद्या देशाच्या आर्थिक प्रगतीस खाजगी उद्योगधंदे कोणत्या स्वरूपांत हातभार लावूं शकतील हे दोन गोष्टींवर अवलंबून असतें. पहिली गोष्ट म्हणजे त्या त्या देशांत मूलभूत स्वरूपाच्या औद्योगिक सोयी–सवलती कितपत आहेत आणि दुसरी म्हणजे शेतीचा मजबूत पाया. तथापि, आर्थिक विकास हा केवळ आर्थिक स्वरूपाचा राहूं शकत नाहीं. कारण त्यामुळें समाजरचनेंत बदल घडून येऊन लोकांच्या मनोवृत्तींतहि पालट होत असतो. ज्या सरकारला सामाजिक बदलामुळें होणाऱ्या राजकीय प्रतिक्रियांची चांगली जाणीव असते तें सरकार प्रगतीला उत्तेजन देऊं शकतें. नफा मिळविण्याच्या हेतूचें विडंबन करणारें वातावरण निर्माण केलें तर मात्र खाजगी उद्योगधंदे मूळ धरणार नाहींत.

## अपेक्षा कमी करून चालावें लागणार !

"१९५७ असेर आर्थिक उलाढाली सर्व जगभरच अनिश्चित स्वरूपांत होत आल्या होत्या. इंग्लंड, बेल्जम, डेन्मार्क, जर्मनी, नेदरलंड्स, अमेरिका यांतून बँकरेटच्या झालेले उतारामुळें व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें इतर बँकांना कर्जें देणें आखडते घेण्याचा सल्ला दिल्यानें नाणेंबाजारांत पैशाची तंगी निर्माण होण्यास सबळ कारण घडलें आहे. याचा परिणाम जसा मोठ्या व्यापारावर होण्यास सुरवात झाली तसा तो लहान व बारिक-सारक व्यापारावर होऊन त्याचा शेवट आवश्यक गरजेच्या वस्तूंच्या महागाईत झाला. म्हणूनच सर्वसाधारण माणसाचें जीवित खडतर बनत असल्याचें दिसून येत आहे. लढाईच्या ऐन काळांत नव्हती एवढी महागाई वाढत गेल्यानें रोजच्या व्यवहारांत लागणारी पैशाची गरज वाढत जाऊन अर्थव्यवस्था धोक्यांत येते कीं काय अशी भीति वाटत होती. साहजिकच बँकेकडून घेतलेल्या रकमांची परतफेड ठराविक मुदतींत होणें अवघड होऊं लागलें. रिझर्व बँकेच्या सल्लयाप्रमाणें बँकांनीं कर्जें कमी करण्याचें धोरण आंखलें. या कारणानें सरकारनेंहि उत्पादनवाढीकडे लक्ष घालण्याकडे आपली शक्ति वळविली. तरी देखील खाद्यधान्यांच्या किंमतीचा प्रश्न चिंताजनक होऊन बसला तो अजून तसाच आहे गेल्या ७-८ वर्षांपेक्षा चालू सालांतील किंमतीच्या दरांत जवळजवळ २५ ते २७ टक्के वाढ झाली असून पंचवार्षिक योजनांच्या पूर्ततेसाठी लागणाऱ्या पैशामुळें धान्याच्या उत्पन्नावर ताण पडला व धान्याच्या उत्पादनांत घट आली आणि शेवटीं त्यांच्या किंमती चढत गेल्या. अगोदरच झालेली महागाई व धान्य-उत्पादन घट यामुळें जीवनोपयोगी वस्तू मिळणेच्या अडचणींत भरच पडली. धान्याचे सांठे करून ठेवण्याची प्रवृत्ति वाढली व त्यांच्या किंमती वर राहिल्या. यावर उपाय म्हणून सरकारनें धान्याचे सांठे ताब्यांत घेण्यासाठी स्वत:कडे जास्त अधिकार घेतले. गहूं व तांदूळ यांच्या विभागीय हालचालींवर बंदी घातली. धान्याच्या तारणावरील बँकांच्या कर्जांवरहि कडक निर्बंध घातले हें सर्व करूनहि तंगीची परिस्थिति आटाक्यांत येईल अशी खात्री पटेनाशी झालेली आहे. राहणीचा खर्च आटोक्यांत ठेवण्याबरोबर उत्पादनवाढीचा खर्चेहि मर्यादित ठेवणें जरूर आहे. याचा अर्थ इतकाच कीं आर्थिक परिस्थिति सुधारून शेतीच्या मालाचें उत्पादन येत्या ५ वर्षांत आतांच्या निदान सव्वापट तरी वाढविणें जरूरीचें आहे लोकांच्या मागण्या मर्यादित ठेवल्या जाऊन येतीं कांहीं वर्षें अपेक्षा कमी करून कामें करावीं लागणार असल्याचें सर्वांनीं लक्षांत ठेवावयास हवें."—कराड अर्बन को. बँकचे चेअरमन, श्री. वि. कृ. तांबवेकर.

---

## पोस्टाच्या तिकिटांवरील नवें जलचिन्ह

भारतीय पोस्टाच्या तिकिटावर दि. २७ ऑक्टोबर, १९५८ पासून नवीन जलचिन्ह ( वॉटरमार्क ) वापरण्यांत येणार आहे. सध्या टपालाचीं तिकिटें छापण्यांत येणाऱ्या कागदावर पंचकोनी ताऱ्याचें चिन्ह असतें. त्याऐवजीं आतां अशोकस्तंभ राहील. सुरुवातीला नवीन जलचिन्हांकित कागद २, ५, १०, २०, व २५ नया पैशांच्या तिकिटांसाठी वापरण्यांत येईल. या मूल्यांचीं हीं तिकिटें मुंबई, नागपूर, आदि प्रमुख टपालकचेऱ्यांत व १२ तिकिट संकलन केंद्रांत २७ ऑक्टोबर रोजीं मिळतील.


स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, *चिरमुले निकेतन*, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ असेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-८-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,९०,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड ( सांगली )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.